# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता दहावी : पूर्व चाचणी

**इयत्ता : दहावी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................................................. **हजेरी क्र. :** ...................

**शाळेचे नाव :** ............................................................................................ **दिनांक :** ......................

(**सूचना :** आवश्यकतेनुसार उत्तर लेखनासाठी पुरवणी कागद/वही वापरावी.)

**प्र. १) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती कर. (लेखन २, ३)**

आपले जीवन सुखी, समाधानी आणि यशस्वी असावे असे प्रत्येक माणसाला वाटत असते; पण तसे होत नाही. उलट सर्वत्र पाहिले असता 'दुःख मणभर, सुख कणभर' असाच अनुभव येतो; पण असे का होते? याचा विचार माणूस करत नाही. माणसाच्या जीवनात सर्व समस्या निर्माण होतात, त्याच्यामागे 'अहंकार' राक्षस असून तोच सर्व समस्यांना कारणीभूत असतो. हा अहंकार डोळ्यांना दिसत नाही. तो स्वतः जवळ आहे हे कळत नाही. कारण तो सूक्ष्म स्वरूपातही असतो आणि स्थूल स्वरूपातही असतो. जोपर्यंत माणसाच्या ठिकाणी अहंकार आहे तोपर्यंत त्याला ज्ञान प्राप्त होणे कठीण व समाधान मिळणे त्याहूनही कठीण. माणसे अहंकाराचा फुगा कळत नकळत फुगवतच असतात. अज्ञानाला आलेला आकार म्हणजे अहंकार. या अहंकाराचा नाश झाल्याशिवाय माणसाला सत्याचा व सुखाचा साक्षात्कार होणे शक्य नाही, म्हणून माणसाला सुखी व समाधानी जीवन जगायचे असेल तर अहंकारावर लक्ष केंद्रित करून त्याला ताब्यात ठेवणे शिका.

**१) एका शब्दात उत्तरे लिही.** **(२ गुण)**

अ) माणसाचा जीवनाबद्दलचा विचार : ..................................................................

आ) माणसाचा सुख-दुःखाबद्दलचा अनुभव : ........................................................

२) अ) कारण लिहा. अहंकार डोळ्यांना दिसत नाही. **(१ गुण)**

..........................................................................................................

..........................................................................................................

आ) केव्हा ते लिहा. माणसाला ज्ञान व समाधान प्राप्त होईल... **(१ गुण)**

..........................................................................................................

..........................................................................................................

३) अहंकाराचा नाश करण्यासाठी माणसाने काय केले पाहिजे, असे तुला वाटते ते लिही. (३ गुण)

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

प्र. २) **खालील पद्याच्या आधारे सूचनेप्रमाणे कृती कर. (वाचन ४)**

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या
भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या
पहारे आणि तिजोऱ्या, त्यांतूनि होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या
जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या
महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हां जमीन माने, या झोपडीत माझ्या
येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा या झोपडीत माझ्या
पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या

१) कवीने वर्णन केलेली झोपडीतील सुखे. **(२ गुण)**

१) .................................... २) ....................................

३) .................................... ४) ....................................

२) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या लिही. **(२ गुण)**

१) .................................... २) ....................................

३) .................................... ४) ....................................

३) खालील ओळींचा सरळ अर्थ लिही. (२ गुण)

जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या

.........................................................................................................

.........................................................................................................

प्र. ३) **व्याकरण घटकांवर आधारित कृती. (लेखन ४, भाषाभ्यास १, ३, ४)**

**अ) खालील ओळीतील उपमेय व उपमान ओळख.** **(१ गुण)**

१) सुरेशचे अक्षर मोत्यासारखे आहे.

उपमेय : ............................ उपमान : ................................

**ब) खालील वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.** **(२ गुण)**

१) टकळी चालविणे : ...............................................................................

.........................................................................................................

२) नाळ तुटणे : .......................................................................................

.........................................................................................................

**क) खालील वाक्यातील लेखननियमानुसार अशुद्ध असलेले शब्द ओळख व ते शब्द शुद्ध करून वाक्य पुन्हा लिही.** **(१ गुण)**

१) तांदळाचं आता दाणेदार पिक येइल म्हणुन धन्यवाद देतो.

.........................................................................................................

**ड) खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिही.** **(१ गुण)**

१) ; : ............................ २) ! : ............................

**इ) खालील ओळीतील रस ओळख.** **(१ गुण)**

१) देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा : ................................

**प्र. ४) कथालेखन. (लेखन ३, ८)** **(५ गुण)**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिही.**

एक जन्मतः अंध मुलगी ····· शिक्षणाची प्रचंड ओढ ····· आई वडिलांना सांगून शाळेत प्रवेश ····· मन लावून शिक्षकांचे शिकवणे श्रवण करणे ····· यूट्यूबद्वारे शिकणे ····· कलेक्टर होण्याचा ध्यास ····· पदवी मिळवणे ····· युपीएससी पास होणे ····· स्वप्नपूर्ती ·····

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**प्र. ५) तुमच्या शाळेची प्रवेशासाठी जाहिरात तयार कर. (लेखन ८)** **(५ गुण)**

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................